श्री.भगवान खारके, यांना वरिष्ठ अधिव्याख्याता पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन आदेश क्रमांक : मानीव -४३२५/ई-ऑफिस १५६१८४८/प्रशा-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- २१ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा:-</u>

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/व्हीआयपी/२१०/प्र.क्र.४१२ /का-१२, दि.२१.०८.२०१५.

२) शिक्षण आयुक्तालय, पुणे या कार्यालयाचे पत्र दि.१२.०२.२०२६.

३) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक -एसएओ-१७१२/प्र.क्र.२२९/प्रशा-२, दि.२०.१०.२०१४.

४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.एसएओ-०८१२/प्र.क्र.३३६/प्रशा-२, दि.१०.०८.२०२३.

५) मूळ अर्ज क्र.३१८/२०१९ मधील मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे दिनांक १७.०८.२०२१ रोजीचे आदेश.

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. भगवान खारके, यांना दि.१०.०३.२०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये अधिव्याख्याता (गट-ब) या पदावरुन वरिष्ठ अधिव्याख्याता (गट-अ) या पदावर पदोन्नती देण्यात आली होती. तथापि, श्री. खारके यांनी त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेला दि.२४.०१.२०१३ हा पदोन्नतीचा दिनांक मानीव दिनांक म्हणून मिळण्यासाठी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.३१८/२०१९ दाखल केला होता. सदर प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक १७.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री. खारके यांना दि.२४.०१.२०१३ हा मानीव दिनांक देण्याबाबत निर्णय दिला होता. तथापि, सदर आदेशाचे अनुपालन न झाल्याने श्री. खारके यांनी मा. न्यायाधिकरणामध्ये अवमान अर्ज क्र. ०६/२०२६ दाखल केला आहे. सेवाज्येष्ठता यादीतील त्रुटीमुळे श्री.खारके यांना अन्य अधिकाऱ्यांसोबत दिनांक २४.०१.२०१३ रोजीच्या आदेशान्वये वरिष्ठ अधिव्याख्याता, गट-अ संवर्गात पदोन्नती देता येणे शक्य झालेले नाही. सदर प्रकरणी मा.न्यायाधिकरणाचे आदेशानुसार श्री.खारके यांना वरिष्ठ अधिव्याख्याता पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :

श्री.भगवान खारके यांना वरिष्ठ अधिव्याख्याता, गट-अ या पदावरील पदोन्नतीचा दि.२४.०१.२०१३ हा मानीव दिनांक म्हणून खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	पदोन्नतीचे पद व सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर	पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष नियुक्तीचा दिनांक	पदोन्नतीच्या पदाचा मंजूर करण्यात येत असलेला मानीव दिनाक
१	२	३	४	५
१	श्री.भगवान खारके	वरिष्ठ अधिव्याख्याता (वेतनस्तर : एस-२०, रु.५६१००-१७७५००)	दि.१०.०३.२०१६	दिनांक २४.०१.२०१३

३. <u>सदर मानीव दिनांक हा खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे:-</u>

१) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम-३२ नुसार वाढीव जबाबदाऱ्यासहीत बढतीचे नवीन पद ग्रहण करावयाचे असेल, तेव्हा नवीन पदाची कर्तव्ये स्विकारली असतील, त्या तारखेपासूनच उच्चस्तर वेतन अनुज्ञेय होईल.

२) श्री.खारके यांना वरिष्ठ अधिव्याख्याता (गट-अ) या पदोन्नतीच्या पदावरील मंजूर करण्यात आलेल्या दिनांक २४.०१.२०१३ या मानीव दिनांकापासून त्यांची काल्पनिक वेतन निश्चिती करण्यात यावी.

३) तथापि, सदर काल्पनिक वेतननिश्चितीच्या अनुषंगाने वेतन व भत्यांची थकबाकी, श्री.खारके यांना अनुज्ञेय राहणार नाही.

४. सदर आदेश हा सामान्य प्रशासन विभागाच्या (अनौपचारिक संदर्भ क्र.५८/२०२६/ई/सेवा-२, दि.०९.०६.२०२६) व वित्त विभागाच्या सहमतीनुसार, तसेच, श्री.खारके यांच्या मानीव दिनांकाच्या प्रस्तावास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता प्राप्त होण्याच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८२११२५२११५८४९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SIDDHARTHA SAHEBRAO GHORPADE

Digitally signed by SIDDHARTHA SAHEBRAO GHORPADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT.,
2.5.4.20=6772091c132df9bf65ea514d28bc392c7f04593129b9648f59519dd184a93538, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C2D3416097D6E0C4E8489E1482CD5F42C4EDB7A2B33F63A57070E0F0D4F766E, cn=SIDDHARTHA SAHEBRAO GHORPADE
Date: 2026.08.21 12:53:43 +05'30'

(सिध्दार्थ घोरपडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

२) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, महाराष्ट्र, पुणे.

३) संबंधित अधिकारी (शिक्षण आयुक्तालयामार्फत)

४) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता व लेखा परीक्षा) महाराष्ट्र/मुंबई-१

५) जिल्हा कोषागर अधिकारी, नाशिक

६) कक्ष अधिकारी (सेवा-२/कार्या-१२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) कक्ष अधिकारी (सेवा-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) निवड नस्ती/प्रशा-२.